**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०४**

मी शपथेवर सत्यकथन करतो की,

माझे नाव – मारुती बाबु पवळ,

वय:– अंदाजे ७५ वर्षे, धंदा:–काही नाही,

राहणार:– जातेगाव, जामखेड ता. जामखेड, जि. अहमदनगर

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांचा उलटतपास प्रतिवादींचे सुविद्य विधिज्ञ श्री. जे. एम. कोल्हे यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

**०१.** हे म्हणणे खरे आहे की, मला मा. न्यायालयाचे साक्ष देणेकामीचे साक्ष समन्स मिळालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी मा. न्यायालयात वादी क्रमांक ०१ निलेश याचेसोबत आलेलो आहे. माझे इयत्ता १०वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. मी जातेगाव येथे मागील ३० ते ३५ वर्षांपासून कोतवाल म्हणून काम पाहत होतो. मी मागील १० ते ११ वर्षांपासून कोतवालचे काम बंद केले आहे.

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, मी कोतवाल म्हणून काम पाहत असतांना माझ्यावर बऱ्याच तलाठयांचा विश्वास होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे बरेच तलाठी मला ७/१२ उताऱ्यावर नोंदी करण्याचे काम सांगत असत. हे म्हणणे खरे नाही की, तलाठी माझ्याकडे कोरा ७/१२ उतारा त्यांची सही करुन देत होते. आता मला निशाणी क्रमांक येथील सन २००५ मधील गट क्रमांक ६८३ चा ७/१२ उतारा दाखविण्यात आला. सदर ७/१२ उताऱ्यावरील नोंदी हया माझ्या हस्ताक्षरात लिहिलेल्या आहेत.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, तलाठी कार्यालयातील संपूर्ण दप्तर (दस्तावेज) हे माझ्या ताब्यात होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९४–९५ साली खरेदीखत झाल्यानंतर ७/१२ सदरी साधारणत: १५ दिवसांनंतर त्या व्यवहाराची नोंद केली जात असे. प्रतिवादी क्रमांक ०१ शंकर याने वादी क्रमांक ०२ मधुकर याच्या हक्कात करुन दिलेले निशाणी क्रमांक ३१ येथील खरेदीखतातन्वये ७/१२ उताऱ्यावर नोंद कधी केली हे मला सांगता येणार नाही.

**०४.** आता मला निशाणी क्रमांक येथील फेरफार क्रमांक २९८ ची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, सदर फेरफारवर दिनांक २८/०४/१९९४ च्या खरेदीखताची नोंद दिनांक ३०/०४/१९९४ रोजी घेण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, सदर फेरफार उताऱ्यावरील वरील हस्ताक्षर माझे नाही.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, यापूर्वी बऱ्याचवेळा मी साक्षीदार म्हणून न्यायालय तसेच तहसिल कार्यालय येथे हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, शेतीमध्ये मी पाहणी केल्यानंतर ७/१२ उताऱ्यावर पीकपाणी सदरी माझ्या सांगण्यानुसार नोंदी केल्या जात होत्या. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ शंकर याने वादी क्रमांक ०२ मधुकर यांच्यामध्ये दिनांक २८/०४/१९९४ रोजी खरेदीचा जो व्यवहार झाला त्याबाबत मला कोणतीही माहिती नाही, तसेच मला सदर व्यवहारामध्ये विसार म्हणून किती रक्कम दिली तसेच सदरचा व्यवहार कधी झाला याबाबतची मला व्यक्तीश: कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ शंकर याने वादी क्रमांक ०२ मधुकर यांचे हक्कात दिनांक २८/०४/१९९४ रोजी करुन दिलेल्या खरेदीखताच्या व्यवहाराच्या दिवशी मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रतिवादी क्रमांक ०१ शंकर याने वादी क्रमांक ०२ मधुकर यांच्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत कोणतीही माहिती नाही.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, माझी शपथपत्रामध्ये लिहिलेला मजकूर मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादींच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण,**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/-

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांक:- २५/११/२०२५
ठिकाण:- जामखेड

**(साक्षीदाराचा जबाब त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदविला)**